सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/२८९ दिनांक : २८/०३/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : आदर्श आचार संहितेच्या कालावधीत लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अनुषंगाने मतदान जन–जागृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुचनेबाबत...**
**संदर्भ : संकीर्ण–२०२४/प्र.क्र. १/वि शि ५ दिनांक २६/०३/२०२४ चे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाधीन पत्राद्वारे लोकसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ अनुषंगाने प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी **''आदर्श आचार संहितेच्या कालावधीत नविन मतदार नोंदणी व नवमतदारांमध्ये मतदानाप्रती जनजागृती करण्याकरिता विद्यापीठे, महाविद्यालये यांच्यामध्ये आयोजित कार्यक्रमांमध्ये राजकीय पक्षांशी संबंधित व्यक्ती व राजकीय पक्षाचे नेते/कार्यकर्ते यांचा कोणताही सहभाग असणार नाही तसेच त्यांचेकडून सदर कार्यक्रमाचा प्रचाराकरिता उपयोग करून घेता येणार नाही याची दक्षता घेण्याबाबत''** निर्देश दिले आहेत.

त्यानुसार महाराष्ट्र शासन उच्च च तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक–४२१, यांच्या निर्देशानुसार आदर्श आचार संहितेच्या कालावधीत आपल्या महाविद्यालय/परिसंस्थांमध्ये सदर कार्यक्रमांचे आयोजन करताना योग्य ती दक्षता घेण्याबाबत संबंधितांस सूचित करण्यात यावे.

या संबंधीचे सविस्तर पत्र, आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. शासन निर्देशानुसार आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४२१,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID : **vishi5.hted-mh@mah.gov.in**

क्र. संकीर्ण-२०२४ / प्र.क्र. १ / वि शि ५ दिनांक :- २६/०३/२०२४

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक क्र. आर/ 1982
दिनांक : 26.03.2024
जावक दिनांक : 27-03-2024
विभाग : BSD / NSS

प्रति-
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
संचालक, कला संचालनालय, मुंबई
कुलसचिव,सर्व अकृषी विद्यापीठे / सर्व अभिमत विद्यापीठे / सर्व स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य

विषय - आदर्श आचार संहितेच्या कालावधीत लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ अनुषंगाने मतदान जन-जागृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुचना

संदर्भ - प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूकअधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे क्र. एमसीएम २०२४/प्रक्र२२६/ निवडणूक /कार्या-३३, दि. २५/३/२०२४ चे पत्र

महोदय,

संदर्भाधीन पत्राद्वारे लोकसभा सार्वत्रिक निबडणूक -२०२४ अनुषंगाने प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी **"आदर्श आचार संहितेच्या कालावधीत नविन मतदार नोंदणी व नवमतदारांमध्ये मतदानाप्रती जनजागृती करण्याकरिता विद्यापीठे, महाविद्यालये यांच्यामध्ये आयोजित कार्यक्रमांमध्ये राजकीय पक्षांशी संबंधित व्यक्ती व राजकीय पक्षाचे नेते / कार्यकर्ते यांचा कोणताही सहभाग असणार नाही तसेच त्यांचेकडून सदर कार्यक्रमाचा प्रचाराकरिता उपयोग करुन घेता येणार नाही याची दक्षता घेण्याबाबत"** निर्देश दिले आहेत. तरी सदरहू अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

26/3/24
( शरद कोकाटे)
कक्ष सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत - कक्ष अधिकारी (कार्यासन ३३), सामान्य प्रशासन विभाग , मंत्रालय, मुंबई -३२

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्र.एमसीएम-२०२४/प्र.क्र.२२६/निवडणूक/कार्या-३३
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक २५ मार्च, २०२४

प्रति,

प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विषय :-** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ अनुषंगाने मतदान जन-जागृती कार्यक्रमात राबविण्याच्या अनुषंगाने सूचना.

**संदर्भ :-** (१) भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.४३७/६/INST/ECI/FUNCT /MCC/२०२४ (MCC Enforcement), दि.०२/०१/२०२४
(२) या कार्यालयाचे समक्रमांकित दि.०५/०३/२०२४ व दि.०७/०३/२०२४ व दि.१६/०३/२०२४

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत भारत निवडणूक आयोगाने दि.१६/०३/२०२४ च्या प्रसिध्दिपत्रकान्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम घोषित करुन आदर्श आचारसंहिता लागू केलेली आहे. त्यानुषंगाने नमूद करण्यात येते की, नविन मतदार नोंदणी व नव मतदारांमध्ये मतदानाप्रती जनजागृती करण्याकरीता विद्यापीठे, महाविद्यालये व शाळांमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत आयोजीत सदर कार्यक्रमांमध्ये राजकीय पक्षांशी संबंधित व्यक्ती व राजकीय पक्षाचे नेते/ कार्यकर्ते यांचा कोणताही सहभाग असणार नाही तसेच त्यांचेकडून सदर कार्यक्रमाचा प्रचाराकरीता उपयोग करुन घेत येणार नाही, याची दक्षता घेण्याबाबत आपल्या विभागांतर्गतच्या सर्व विद्यापीठे, महाविद्यालये शाळांना सूचना देण्यात याव्यात. ही विनंती.

आपला

(एस. चोक्कलिंगम्)
प्रधान सचिव, मुख्य निवडणूक अधिकारी,